## 🙏 ऐतिहासिक घोषणा – नव्या पर्वाची सुरुवात 🙏

## “Finance And Accounts Employees Union (FAEU)”

सर्व लेखा बांधवांना लेखा अभ्यास गटाचा अभिमानपूर्वक नमस्कार! 🙏

गेल्या 20 दिवसांपासून आपण अथक परिश्रम घेत आहोत — कायदेशीर कागदपत्रे तयार करणे, महाराष्ट्रभर जोडणी, Legal Fund सारख्या आधुनिक संकल्पनेचा पाया — या सर्व प्रयत्नांचा परिणाम म्हणजे आपली नवीन संघटना:

**"Finance And Accounts Employees Union (FAEU)"**

आता, या नवीन सुरुवातीच्या क्षणी, आपण आपल्या नवीन संघटनेचे नाव आणि लोगो आपल्या सर्वांसमोर सादर करीत आहोत, आणि आपल्या सर्वांना या क्रांतीत सामील होण्याचे हृदयापासून आवाहन करीत आहोत!

---

### *FAEU का आवश्यक आहे?*

आपण सर्वांनी अनुभवले आहे की, उपलब्ध समग्र संघटना (सर्व संवर्ग संघटना) यांनी लेखा कर्मचाऱ्यांची भूमिका कधीच स्पष्टपणे मांडली नाही.प्रत्येक वेळी — मग ती पुनर्रचना असो, पे-फिक्सेशन असो, किंवा अमानुष आदेश असोतकिंवा एखाद्या कर्मचाऱ्यावर झालेला अन्याय असेल — या संघटनांनी आपली बाजू प्रशासनाकडे भक्कमपणे कधीच मांडली नाही.आपल्या प्रचलित कामाव्यतिरिक्त अनावश्यक क्षेत्रीय कामे (उदा., थकबाकी वसुली, Low consumption verification, theft detection orders, आणि आता Average Status meter readings) लादली गेली, पण या अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्यात या संघटनांनी प्रचंड निष्क्रियता दाखवली. आज, आपण सर्वजण वेगवेगळ्या संघटनांमध्ये विखुरले गेलो आहोत, ज्यामुळे लेखा संवर्गात एक "अस्तित्वशून्यतेची" भावना निर्माण झाली आहे.

आपण 4,800 लेखा कर्मचारी आहोत — जी एकूण 81,918 कर्मचाऱ्यांच्या तुलनेत कमी संख्या वाटते, पण आपली एकता हीच आपली खरी ताकद आहे!. आपल्याला एक अशी समर्पित संघटना हवी आहे, जी फक्त लेखा कर्मचाऱ्यांचे हित जोपासेल आणि संपूर्ण महाराष्ट्रभर आपले अस्तित्व प्रस्थापित करेल — आणि ती गरज FAEU पूर्ण करेल!

**आपण 4,800 लेखा कर्मचारी असूनही, "अस्तित्वशून्यता" भोगत आहोत. आता याचाशेवट करायचा आहे!**

---

### FAEU – आपल्या एकतेचा आणि नवीन दृष्टिकोनाचा परिणाम!

- आपण सर्वांनी मिळून लेखा अभ्यास गटाच्या माध्यमातून उपयुक्त योजना आखल्या.
- आपण पुनर्रचनेतील अन्याय आणि अमानुष आदेशांविरुद्ध लढा दिला — 1300 लेखा बांधवांनी एकत्र येऊन प्रशासनाला आणि सर्व संघटनांना निवेदन दिले, प्रशासन अतिशय अन्यायकारक पुनर्रचना राबविणेकडे पोचले तो पर्यंत समग्र संघटनांनी लेखा संवर्गाकडे व आपल्या अभ्यासपूर्ण निवेदनाकडे पद्धतशीरपणे दुर्लक्ष केले साधं प्रशासनाला विचारणा करणारे पत्र सुद्धा कोणी दिले नाही.हे आजच नाही नेहमीचे धोरण यांचे असल्यामुळे आपणास अधोगती, अपमान पत्करावे लागत आहे.
- मग आपण लेखा संवर्गाचा गाढा अभ्यास असलेले वरिष्ठ लेखाधिकारी आणि निवृत्त लेखा अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन घेतले.
- या सर्व अनुभवांमधून आपण एकच निष्कर्ष काढला — "आपल्याला एक नवीन संघटना हवी, जी अनेक वर्षांपासून होत असलेल्या अन्यायाचे निराकरण करण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करेल."
- आणि म्हणूनच, लेखा अभ्यास गटाने आपल्यासमोर FAEU ची मांडणी केली आहे!
- FAEU ही आपली स्वतःची संघटना आहे, जी आपल्या हक्कांसाठी आणि सन्मानासाठी लढेल.
- आपण सर्वांनी एकत्र येऊन औंढेकर प्रकरणात आपली एकता दाखवली, आणि आता तीच एकता आपण FAEU च्या माध्यमातून पुढे नेत आहोत.(अजूनही परभणी मंडळातील लेखा बांधवांना न्याय भेटलेला नाही)
- आपण नवीन परिणामांसाठी नवीन प्रयत्न करीत आहोत — आणि FAEU हा त्या नवीन प्रयत्नांचा पाया आहे!

---

### *FAEU चे उद्दिष्ट:*

*** FAEU ची निर्मिती इतर संघटना किंवा संवर्गांविरुद्ध लढण्यासाठी नाही, तर आपली बाजू प्रशासनाकडे भक्कमपणे मांडण्यासाठी आहे!.आपण सर्वांनी मिळून ठरवले आहे की, आपण फक्त लेखा कर्मचाऱ्यांच्या हक्कांसाठी आणि सन्मानासाठी लढणार आहोत:**

✅ लेखा संवर्गासाठी स्वतंत्र आणि समर्पित व्यासपीठ

✅ कायदेशीर लढ्यासाठी Legal Fund ची स्थापना

✅ कामाचे तर्कसंगत आणि अद्ययावत नियम सुनिश्चित करणे.

✅ मॅनेजमेंटशी समान कामाचा भार आणि सन्मानासाठी चर्चा करणे.

✅ संपूर्ण महाराष्ट्रभर लेखा आणि वित्त कर्मचाऱ्यांमध्ये एकता वाढवणे.

### *Legal Fund – आपल्या हक्कांचा वकिल!*

- हा फंड मॅनेजमेंटच्या अन्यायाविरुद्ध कायदेशीर लढाई लढण्यासाठी वापरला जाईल.
- हा फंड फक्त कायदेशीर हेतूसाठी वापरला जाईल.
- सदस्य शुल्कातील 1/3 रक्कमकेवळ *कायदेशीर लढ्यांसाठी*
- लेखा अभ्यास गटाने या फंडाची आणि संघटनेची स्थापना करण्यासाठी प्रत्येकी 15,000 रुपये योगदान दिले आहे.

आपण सर्वांना सांगू इच्छितो की, आपण कोणत्याही परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी तयार आहोत. आपण दूरदृष्टी ठेवणारे आणि कटिबद्ध आहोत!

---

### *आव्हान आणि विनंती:*

**उत्स्फूर्त सहभाग: आपल्या कार्यालयातील आणि परिसरातील लेखा कर्मचारी बांधवांना FAEU बद्दल माहिती द्या. त्यांना या WhatsApp ग्रुपमध्ये सामील करा आणि त्यांना FAEU मध्ये नोंदणी करण्यास प्रोत्साहित करा.**

**मदतीसाठी पुढे या: आपण आपल्या परिसरात FAEU च्या प्रचारासाठी आणि नोंदणीसाठी स्वयंसेवक बनू शकता. आपण लेखा अभ्यास गटाशी थेट संपर्क साधू शकता.**

**आपले विचार मांडा: या WhatsApp ग्रुपवर आपले विचार, सूचना आणि अनुभव शेअर करा, जेणेकरून आपण सर्वजणFAEU ला अधिक मजबूत बनवू शकू.**

**आपण सर्वांनी एकत्र येऊन एक असे कार्यस्थळ घडवूया, जिथे लेखा आणि वित्त कर्मचाऱ्यांना सन्मान मिळेल, आणि आपल्या हक्कांचे रक्षण होईल.**

***आम्ही कोणाविरुद्ध नाही – पण आपल्या बाजूने आहोत!***

**FAEU**ही इतर कोणत्याही संघटनेविरुद्ध नाही. ही संघटना आहे*आपल्या हक्कांसाठी आणि सन्मानासाठी लढणारी.*

---

"एकजुटीने लढा – बदल घडवा!"
**"Finance And Accounts Employees Union (FAEU)"**
**Together, We Rise for Rights!**

**सादर,**
**लेखा अभ्यास गट**
***MSEDCL लेखा कर्मचारी***